अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जा.क्र :- अतिमआ(ज)/साप्रवि/ ४११९
दिनांक :- १६/१०/२०२०

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय : पुणे महा मेट्रो प्रकल्पा अंतर्गत मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील सिटी स. नं. १९, फायनल प्लॉट नंबर १०९, राजीव गांधी व जुना तोफखाना येथील पुनर्वसन करणेकामी अधिकारी/कर्मचारी यांचे नेमणूकीबाबत

पुणे महा मेट्रो प्रकल्पा अंतर्गत मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील सिटी स. नं. १९, फायनल प्लॉट नंबर १०९, राजीव गांधी व जुना तोफखाना येथील पुनर्वसन कामकाज विहित कालावधीत पूर्ण होणेचे दृष्टिने श्री. नितीन उदास, उप आयुक्त (परिमंडळ क्र.२) यांचे नियंत्रणाखाली खालील अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी नावे | हुद्दा | सध्याचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. चव्हाण मोहन महादेव | कनिष्ठ अभियंता | अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग |
| २ | श्री. मते मनोजकुमार रमेश | कनिष्ठ अभियंता | अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग |
| ३ | श्री. मोहीते राम गेनू | कनिष्ठ अभियंता | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग |
| ४ | श्री. पोपळे सुनिल गीताराम | कनिष्ठ अभियंता | भवनरचना विभाग |
| ५ | श्री. पाटील सुनिल जयसिंगराव | कनिष्ठ अभियंता | पथ विभाग |
| ६ | श्री. गंगावणे संजय कोंडीबा | लिपिक टंकलेखक | अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग |
| ७ | श्रीमती चव्हाण सारिका राजेंद्र | लिपिक टंकलेखक | क्रिडा विभाग |
| ८ | श्री. आवटे राजेश विठ्ठल | लिपिक टंकलेखक | भवनरचना विभाग |
| ९ | श्री. क्षिरसागर विनायक लक्ष्मीकांत | बिगारी | झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग |
| १० | श्री. पाटोळे गणेश पोपट | बिगारी | झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग |

उपरोक्त अधिकारी /कर्मचारी यांनी खालीलप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

१. दैनंदिन कामकाज श्री. नितीन उदास, उप आयुक्त,परिमंडळ क्र.२ यांचे नियंत्रण व देखरेखीखाली राहील.

२. उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांनी मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील सिटी स. नं. १९, फायनल प्लॉट नंबर १०९, राजीव गांधी व जुना तोफखाना येथील मेट्रो प्रकल्पाने बाधित होणाऱ्या क्षेत्राचे सर्वेक्षण करणे, सदर प्रकल्पात बाधित होणाऱ्या कुटुंबाचे कागदपत्रे जमा करणे / पडताळणी करणे, सदर प्रकल्पात बाधित होणाऱ्याची अंतिम पात्रता यादी निश्चित करणे, इ. कामकाज करावयांचे आहे.

३. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांनी दैनंदिन कामकाजाचा अहवाल उप आयुक्त,परिमंडळ क्र.२ यांना सादर करावा.

४. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे कामकाज सांभाळून सदरचे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे.

५. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांची पुढील आदेश होईपर्यंत नेमणूक करण्यात येत आहेत.

६. उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांचे दरमहाचे वेतन मुळ खात्यांमार्फतच आदा करण्यात यावे.

उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांना सदर कामकाजाकरिता कार्यमुक्त करणेत येत असून स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही. सदर अधिकारी/ कर्मचारी यांनी आपला रुजू अहवाल उप आयुक्त (परिमंडळ २) यांचे मार्फत सादर करावा.

Rubal 16/10/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत - सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी
संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.

यांजकडे पुढील तजविजीसाठी रवाना ...